Acknowledgement

# : मनोगत :

महाराजा सयाजीराव विद्यापीठात मराठी हा विषय घेऊन मी शिकण्यास सुरवात केली, तिथपासून ते आज पीएच.डी. चा हा प्रबंध सादर करत आहे, इतपर्यंतचा माझा प्रवास मला एक वेगळाच अनुभव देणारा ठरला. एफ.वाय. चे वर्ष अनेक विषयातला एक विषय म्हणून मी मराठी शिकत होते; पण आपल्याच भाषेतील या अनुभवसमृद्धसाहित्याची मला जी काही गोडी लागली, ती वाढत जाऊन त्याचा अभ्यास करावा या प्रेरणेत केव्हा रूपांतर झाले, ते लक्षातही आले नाही, इतकी ही क्रिया सहजपणानं घडली, अर्थातच याचे सारे माझ्या शिक्षकांचे आहे.

एम.ए. ला कलाशाखेत पहिले स्थान मिळाल्यावर, आता आपण हा अभ्यास वाढवला पाहिजे ही उर्मी मला स्वस्थ राहू देईना, त्यामुळे आपल्याहातून काहीतरी काम घडावे या भावनेने मी आमच्या विभागप्रमुख डॉ. सुषमा करोगल यांच्याशी चर्चा करून, पीएच.डी. साठी अभ्यास विषयाची निवड केली. राजन गवस यांच्या 'चौंडकं' सारख्या काही कादंब-या मी ग्रंथालयात वाचल्या होत्या. रूढीपरंपरेने स्त्रियांच्या जगण्याची जी अवस्था त्यात चित्रित केली होती, ती जाणून माझे मन हलून गेले होते. खरेतर मी गुजरातसोडून फारशी कुठे बाहेर पडलेली नाही, पण गुजरातेतही अशा प्रथा "बहुचराजी माता"च्या संदर्भात आहेत हे मला माहीत होते, हे सगळे मनात जागे होत गेले व मी राजन गवस यांच्या साहित्याचा अभ्यास करण्याचे ठरवले; मग त्यात त्यांच्या समीक्षा, मुलाखती यांचा फारसा विचार केलेला नसून फक्त आजपर्यंतच्या निर्मितीशील प्रकाशित साहित्याचा विचार करावा असे ठरले.

अभ्यासविषय नक्की केल्यावर मुंबई येथील ग्रंथसंग्रहालयाला भेट देणे, हंसा महेता ग्रंथालयाचा वापर करणे यासाठी अधिकाधिक वेळ देणे आवश्यक होते, संदर्भसूची तयार करणे, टिपणे काढणे, संदर्भ गोळा करणे या सर्व आवश्यक त्या गोष्टींची पूर्तता करताना घरसंसार सांभाळणा-या मुलीला ज्या ज्या संभाव्य उडचणी येतात, त्या त्या सर्व संभाव्य अडचणी प्रत्यक्ष बनून माझ्यासमोर आल्या. अनेकदा मी परिस्थितीने गांगरले, मनाची द्विधा अवस्था झाली, आशंका निर्माण झाल्या, पण डॉ. सुषमा करोगल यांच्या मार्गदर्शनाने मी सर्वांवर मात केली, परिस्थितीने खचून न जाता काम करत राहिले पाहिजे, हे त्यांनी माझ्या मनावर सतत बिंबवले, त्यांचेही जगणे मी पाहात होतेच, त्यामुळे त्यातील 'स्वानुभूत वासाचे दान' मला जाणवले होते. करडेपणा, शिस्त आणि जिव्हाळा यांच्यामुळे त्यांचे आम्हा विद्यार्थ्यांशी एक वेगळ्याच प्रकारचे नाते होते. त्यांच्या या वृत्तीने मला या शोधप्रबंधात जे काही सहकार्य मिळाले, त्याबद्दलच्या माझ्या

भावना शब्दात प्रकट न करणे हेच मला उचित वाटते. त्यांच्या बरोबरच मराठी विभागातील डॉ. मृणालिनी कामत, डॉ. संजय करंदीकर सर, डॉ. वनिता ठाकूर या सर्वांनी माझ्या अभ्यासकार्याबद्दल सदैव आस्था बाळगली, प्रेम दाखविले, माझ्या अडचणीतून मार्ग काढणे अधिक सुलभ केले, त्यामुळे मी या सर्वांची सदैव ऋणी असेन. माझ्या या प्रबंधलेखनाच्या मुद्रितशोधनाचे काम कामत मॅडमनी अतिशय आस्थेने व दक्षतेने केले. याबद्दल केवळ आभार मानणे, म्हणजे औपचारिकता दाखवणे असे नसून माझ्या मनातील कृतज्ञतेला शब्दरूप देणे आहे.

माझे वडील श्री.प्रकाश नानासाहेब देहूकर आणि आई सौ. कल्पना प्रकाश देहूकर हे सेवानिवृत्त दांपत्य. या दोघांनी माझ्या शिक्षणाला सदैव प्रोत्साहन दिले व आपले मायाछत्र माझ्यावर धरले, त्यामुळेच प्रतिकूल परिस्थितीच्या उन्हवा-यातून माझा बचाव झाला. लग्नानंतर पीएच.डी. करण्याचे ठरविल्यानंतर माझे यजमान श्री. आनंद घायाळ यांनी मला जी 'साथ' दिली, ती शब्दापलीकडील आहे; प्रसंगी ते माझे पालक झाले तर प्रसंगी ते माझे कठोर शिक्षकही झाले ! त्यांच्याविना हे माझे काम आज पूर्णत्वास झालेले दिसले नसते, इतके म्हंटले म्हणजे त्यात सर्व आले. कष्टामध्ये माणसाला जे कौतुकाचे चार शब्द हवेहवेसे वाटतात ते मला माझे सासरे श्री.रघुनाथराव घायाळ व माझ्या परमपूज्य सासूबाई स्व.सौ.प्रभाताई घायाळ यांच्याकडून नेहमीच मिळाले; त्या सर्वांच्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

लेखनाच्या कामानंतर त्याला प्रबंधरूप देताना जी काही धावपळ करावी लागते, संगणकाची मदत घ्यावी लागते त्या सर्वात माझा भाऊ सचिन देहूकर माझ्याबरोबर असायचा. अगदी वाहनासह, सर्वार्थाने ! त्याचे आभार मी कसे मानावेत ?

या सर्वांबरोबरच विद्यापीठातील प्रशासकीय अशा सर्व गोष्टीतील संभाव्य अडचणींचे निवारण करण्यात आमच्या कलाशाखेचे डीन डॉ.आर.जे. शहा यांनी जी काही मदत केली, सल्ले दिले, ते सर्व अतिशय अनमोल आहे; त्यांची मी सदैव आभारी आहे.

माझी मुलगी 'विशाखा', तिनं मला सदैव 'आनंद' दिला, त्यानेच माझ्या कामाची उर्जा मला मिळाली, एवढे मी म्हणते. यापलीकडे जाऊन सर्वांचे आभार मानताना, शब्दांना मर्यादा असतात एवढेच मी नमूद करते. सरस्वतीची मजवर, व सर्वांच्यावर अशीच कृपा राहो एवढेच मागणे आहे.

वैभवी प्रकाश देहूकर.


रिवणवायली मुंगी
राजन गवस
चौंडकं
राजन गवस
धिंगाणा
राजन गवस
हुंदका
राजन गवस
S. PHADNIS
कळप
राजन गवस
तणकट
राजन गवस
भंडारभोग